Peer Reviewed and Refereed Journal

ISSN (Online) 2583-181X

# International Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce (IJHSSBMC)

A Quarterly International Research Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce

SRJIF Impact Factor (2024): 8.5

**Volume 8, Issue 3 (September 2024)**

**Editor-in-Chief**

Dhananjay Channale

**Guest Editors**

Prof. Maruf Mujawar

Prof. Dr. Arun Shinde

Infinity Academic & Research Association, Chatrapati Sambhajinagar (MS) INDIA

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | **Orientalism and Historiography**<br>- Dr. Mahadev L. Sontakke | 122 – 126 |
| 26 | **An Analytical Study of Resilience and Mental Health of College Students**<br>- Dr. Arun C. Shinde and Dr. Amol Kamble | 127 – 134 |
| 27 | **कोल्हापूर जिल्ह्यातील आक्रमकता व फिअर ऑफ मिसिंग आऊट (FOMO) यांचा शेअर्स मार्केट करणाऱ्या व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम**<br>- प्रा. पर्वत प्रदीप कांबळे | 135 – 142 |
| 28 | **Women and Education**<br>- Ms. Ranjita Ramesh Kalebere and Dr. Sopan Govind Khade | 143 – 148 |
| 29 | **A Study on Land Degradation in India**<br>- Dr. Santosh Ishwara Barale | 149 – 153 |
| 30 | **Need of Sustainable Agriculture Development in India**<br>- Dr. Shivanand A. Bhandare | 154 – 156 |
| 31 | **Impact of Social Networking Sites on The Users: A Socio-Psychological Analysis**<br>- Dr Vijay K. Gheji and Ms. Priti B. Desai (Gheji) | 157 – 160 |
| 32 | **Socio-Economic and Educational Problems in the Youth of Bhoi Community in Karad City**<br>- Mr. Amol T. Gavade, and Dr. Sandip S. Mane | 161 – 165 |
| 33 | **भारतातील स्त्रीयांच्या समस्या**<br>- प्रा. अमृत दत्तात्रय मुधाळे | 166 – 169 |
| 34 | **Applicability of Swami Vivekananda's Thoughts in Contemporary Indian Society**<br>- Vaibhav Kotekar | 170 – 173 |
| 35 | **समकालीन हिंदी उपन्यास साहित्य में जनचेतना के परिप्रेक्ष्य में नारी विषमता का चित्रण**<br>- प्रा. मारूफ मुजावर | 174 – 177 |
| 36 | **'बाल साहित्य में अभिव्यक्त सामाजिक सदभाव' (क्षमा शर्मा के बाल साहित्य के संदर्भ में)**<br>- डॉ. छाया शंकर माळी | 178 – 182 |
| 37 | **Recent Issues and Challenges of Indian Society and Role of Humanities**<br>- Dr. Ramchandra Baburao Vhanbatte, and Mr. Narayan Janardhan Relekar | 183 – 188 |


Scanned with OKEN Scanner

Open Access

IJHSSBMC
ISSN (online) : 2583-181X

International Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce
(An International Peer-reviewed & Refereed Scholarly Open Access Journal)
ISSN (Online): 2583-181X
Journal homepage: https://ijhsbc.iar-a.com/
Vol. 08, Issue 03, September 2024; Pages 166 – 169
DOI: 10.5281/zenodo.14546880
SRJIF Impact Factor (2024): 8.2

Original Research Article

# भारतातील स्त्रीयांच्या समस्या

**प्रा. अमृत दत्तात्रय मुधाळे**

समाजशास्त्र विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी जि. कोल्हापुर ४१६२०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* amrutmudhale1983@gmail.com

Received: 22 July, 2024 | Accepted: 04 September, 2024 | Published: 06 September, 2024

स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नाही. त्यामुळे आजही त्यांचे स्थान नगण्यच असल्याने त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होताना दिसतो. आधुनिक काळात त्यांना राजकीय, प्रशासकीय व व्यवस्थापन क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे, तरच त्यांचा आर्थिक दर्जा सुधारेल व राष्ट्राच्या प्रगतीत त्यांचे योगदान वाढेल. प्रत्येक स्तरातील महिलांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. तरी सर्वसाधारण समस्यांचा विचार केला तर पुढील प्रमाणे समस्याची वर्गवारी करता येईल. कौटूबिंक हिंसाचार, सामाजिक हिंसाचार, शिक्षणाच्या समस्या, आरोग्याच्या समस्या इत्यादीआहेत

### कौटूबिंक हिंसाचार

महिलांना त्यांच्या लग्नानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते या प्रकारातील समस्या ह्या ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळ्या असू शकतात महिलांना त्यांच्या मर्जी विरुद्ध गर्भ लिंग निदान करायला लावतात व मुलगी असेल तर त्या महिलेला दोष दिला जातो. ज्याच्या पदरी पाप त्याला मुली आपोआप हिच भावना लोकांच्या मनात आहे. म्हणूनच स्त्री भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर होत आहे. कौटूबिंक हिंसाचारात हुंडाबळी, माहेरून पैसे आणण्यासाठी मारहाण, मुले झाले नाहीत किंवा फक्त मुलीच झाल्या म्हणून शारीरिक त्रास, व्यसनी पती असल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी, इ. या समस्या कुटुंबाच्या दबावामुळे सर्वांसमोर येत नाही व पोलिसात तक्रार दिली जात नाही

### हुंडा आजही एक ज्वलंत समस्या

हुंडा' हा दोन अक्षरी शब्द वधूपित्याला कर्जबाजारी करणारा आणि वरपक्षाला मालदार करणारा आणि सुखावणारा शब्द! 'हुंडा' हा विषय रूढार्थाने चावून चोथा झालेला विषय असला तरी आज 21व्या शतकातही भारतीय समाजाला पोखरणारी सर्वात ज्वलंत समस्या ठरला आहे; परंतु समाजातील सर्व थरांमध्ये या समस्येबद्दल कमालीची उदासीनता दिसून येते. ही समस्या स्वातंत्र्यानंतर अधिक ज्वलंत बनून त्याची परिणती जरी हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात झाली असली तरी आज स्वातंत्र्याच्या 65 वर्षांनंतरही हुंडाबळींची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.



Scanned with OKEN Scanner

आज आपली पावले जागतिकीकरणाच्या दिशेने पडताहेत. अशा परिस्थितीत सामाजिक परिवर्तनाकडे 0आपणा सर्वांचेच दुर्लक्ष झाले. मुळात आपला समाज पुरुषप्रधान. म्हणजेच महिलांना दुय्यम स्थान! त्यामुळे महिलांना सर्वाधिक झळ पोहोचविणा-या समस्येकडे, मग त्या समस्येची सामाजिक व्याप्ती कितीही असो, दुर्लक्ष होणारच. 1961 मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात येतो आणि तरीही आज आपल्या भारत देशात दर तासाला एक नववधू हुंडाबळी होते; पैशाच्या हव्यासापायी मारली जाते आणि तरीही हुंडा देणे-घेणे ही समाजात प्रतिष्ठेची बाब मानली जाते. स्वतंत्र भारताची राज्यघटना लोकांनी लोकांसाठी बनवली आणि स्वीकारली तो दिवस 26 नोव्हेंबर 1949. या घटनेत जरी स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वाचा पुरस्कार केला असता तरी प्रत्यक्षात समाजात त्याचा अमल होत नाही. प्रत्यक्ष जीवनात विवाहप्रसंगी मुलीकडची बाजू कनिष्ठ आणि मुलाकडची बाजू श्रेष्ठ, असेच मानले जाते. लग्नात दोन्हीकडचा खर्च; तसेच दागदागिने, भेटवस्तू, मालमत्ता, वरदक्षिणा या आणि अशा अनेक मागण्या वरपक्षाकडून अटीच्या स्वरूपात केल्या जातात. या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, पुरेसा हुंडा मिळाला नाही, किंवा मनासारखे मानपान झाले नाहीत या कारणांवरून विवाहित स्त्रियांचा सासरी नव-याकडून, सासूकडून इतर मंडळींकडून छळ होतो. तिला मानसिक, शारीरिक क्लेश दिले जातात. उपाशी कोंडून ठेवले जाते. मारहाण होते, प्रसंगी जाळून खूनही केला जातो. पुरोगामी म्हणविणा-या महाराष्ट्रात आजही दररोज एक हुंडाबळी जातोय. सासरच्या मंडळींकडून आठवड्याला किमान तीन महिलांच्या हत्येचा प्रयत्न होतो, तर या छळाला कंटाळून आणि हुंड्याची मागणी पूर्ण करू शकत नाही म्हणून दररोज पाच महिला आत्महत्या करून स्वत:चे आयुष्य संपवतात. या स्वतंत्र भारतात त्यांना जगण्याचा अधिकार का नाकारला जातो? या प्रश्नाचे उत्तर आम्ही गेली चाळीस वर्षे शोधत आहोत; परंतु अजून सापडलेले नाही.

वरील आकडेवारी खासगी सर्वेक्षणातील नसून, नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो या सरकारी विभागाने प्रकाशित केलेल्या अहवालातील ‘क्राइम इन महाराष्ट्र-2012’ या नोंदीतून समोर येते. परंतु या नोंदविलेल्या तक्रारींपेक्षा महिलांवरील छळांचे गुन्हे कैक पटीने जास्त आहेत. मुळात महिलांना स्वत:च्या हक्कांविषयी अनभिज्ञता, अशिक्षितपणा, अनिष्ट रूढी- परंपरा यामुळे त्रास व छळ सहन करावा लागतो. लोकलाजेस्तव आणि खोट्या प्रतिष्ठेसाठी अनेक महिला स्वत:वरील अत्याचारांच्या विरोधात गुन्हे दाखल करतच नाहीत. या अहवालानुसार हुंडाबळी प्रकरणात 86% गुन्हेगार पुराव्याअभावी निर्दोष सुटतात. गुन्हा कितीही गंभीर वा क्रूरपणे केलेला असो; पुराव्याअभावी करण्यात आलेले आरोप सिद्ध होऊ शकत नाहीत. आरोपीला संशयाचा फायदा देऊन निर्दोष सोडले जाते. विवाहितेचा छळ पाहिल्याचा प्रत्यक्ष पुरावा न्यायालयासमोर येत नाही. कायदा पुरावा मागतो. पीडित स्त्रीचा छळ उघडपणे इतरांसमक्ष करण्याची शक्यता कमी असते. तसेच ती आत्महत्या कोणाच्या साक्षीने करण्याची शक्यताच नसते. ब-याच वेळेला मृत्यू एखाद्या अपघाताने झाला किंवा ती आत्महत्या होती याचा पुरेसा पुरावा उपलब्ध होत नाही आणि तसा प्रयासही केला जात नाही. अहवालानुसार महाराष्ट्रात 35% गुन्ह्यांचा तपास पूर्ण न झाल्यामुळे कोर्टात आरोपपत्रच दाखल होत नाही. सासरच्या मंडळींकडून छळाच्या ज्या तक्रारी दाखल होतात त्यातल्या दोन टक्के आरोपींनाही शिक्षा होत नसल्याचे आकडेवारी सांगते. या परिस्थितीत पुरुषांना किंवा गुन्हेगारांना कायद्याचा धाक नाही आणि महिलांना स्वत:च्या हक्कांची/अधिकारांची जाण नाही, असेच म्हणावे लागेल. या अहवालातून आणखी एक महत्त्वाची बाब लक्षात आली ती म्हणजे, हुंड्यासाठी छळ आणि हुंडाबळी यासारख्या गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्यांमध्ये महिलांचे प्रमाण जवळजवळ 25 ते 30% आहे. यावरून ‘स्त्री हीच स्त्रीची शत्रू आहे’ असे म्हटले जाते त्यात नक्कीच तथ्य आहे. महिला संघटनांना कदाचित हे अमान्य असेल, परंतु ही वस्तुस्थिती आहे. लग्न समारंभात समाजामध्ये आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून मुलीच्या लग्नात ‘हुंडा’ दिला जातो आणि मुलाच्या लग्नात दामदुपटीने वसूल केला जातो. या प्रथेमुळे कित्येक संसार मोडले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली.

अगणित स्त्रियांच्या जीवनाची राखरांगोळी झाली. परंतु हुंडा प्रथेचा अंत काही दृष्टिपथात नाही. भारतीय संस्कृतीला काळिमा फासणारी ही प्रथा नष्ट करण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याची नितांत आवश्यकता आहे. शहरात तसेच अधिकतर ग्रामीण भागात तरुणांची संवेदना जागृत करून तरुणींना त्यांच्या आत्मसन्मानाच्या रक्षणार्थ, जगण्याच्या अधिकाराच्या रक्षणार्थ ठोस प्रशिक्षण देण्याची गरज आहे. भारतीय समाजात अनेक अनिष्ट रूढी, परंपरा चालू ठेवण्यासाठी आणि स्वार्थासाठी धर्माची जोड देण्याची प्रथा आहे. तसेच हुंडा पद्धतीबाबत झाले आहे. लग्नात कन्यादान होते. कन्यादानानंतर वरपूजा व वरदक्षिणा दिली जाते. काही ढोंगी लोक वरदक्षिणेच्या निमित्ताने हुंडा मागतात. भारतीय समाजात दान करणे म्हणजे पुण्यकर्म मानले जाते. कन्यादानाच्या संकल्पनेमागे पृथ्वीदानाच्या पुण्याची जोड लावून त्यात धार्मिकता आणली. म्हणजे हा धर्मवेडा समाज त्या जाळ्यात अडकलाच म्हणून समजा. यासाठी या विधीमागची दांभिकता



Scanned with OKEN Scanner

आणि अंधश्रद्धा तरुणांना पटवून द्यायला हवी. मुळात मुलगी/ कन्या ही दान द्यायची वस्तू नाही, बापाकडून नव-याकडे हस्तांतरित करण्याची चीजवस्तू नाही; ती एक जिवंत माणूस आहे, तिला व्यक्तिस्वातंत्र्य आहे. याची जाणीव जोपर्यंत तरुणांना होत नाही तोपर्यंत स्त्री-पुरुष समानता अशक्य आहे. तसेच कन्यादानाला कायद्यात स्थान नाही, की कायद्याचे संरक्षण नाही. लग्नसमारंभात होणारा अवाजवी, वारेमाप खर्च, संपत्तीचे प्रदर्शन, अन्नाची नासाडी, विजेचा, पाण्याचा अपव्यय हे सर्व थांबलेच पाहिजे. विवाहित महिलांवर हुंड्यासाठी घराघरांमध्ये होणारे मानसिक व शारीरिक शोषण, हिंसाचार हे भयावह असूनही त्याबाबत समाज इतका उदासीन का? या प्रश्नाचे उत्तरच एक यक्षप्रश्न आहे.

**स्त्री भ्रूणहत्या**

स्त्रीभ्रूणहत्या म्हणजे नवजात मुलींची जाणीवपूर्वक केलेली हत्या होय.

'पुरुषप्रधान संस्कृती' आणि 'पुरुषवर्चस्वी समाज' अशा प्रकारची मानसिकता असलेल्या समाजात/कुटुंबात मुलांच्या (पुरुषांच्या) जन्माला प्राधान्य देऊन स्त्रियांच्या जन्मास विरोध केला जातो. अशा प्रसंगी स्त्रीच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ स्त्रीचा असल्यास गर्भपात करून त्याला नष्ट करण्यात येते. ह्यासाठी भारतात कायद्याने लिंग निदानाला बंदी आहे.

**भारतातील लिंगप्रमाणात लोकसंख्या -** १९०१ साली ९७२ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरुष होती. २००१ साली ९३३ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरुष होती.

महाराष्ट्रातील सहा वर्षांच्या खालील मुलींचे प्रमाण सन २००१ मध्ये ९१३ असे होते. मात्र २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ८८३ इतके म्हणजे जवळ जवळ ३०% खाली उतरले आहे.[१]

हे प्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र - लिंगनिवडीस प्रतिबंध कायदा १९९४ आणि सुधारित कायदा २००३ उपलब्ध आहेत.

**अलीकडील बदल-** स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी भारत सरकार कडून सर्व सोनोग्राफीसेंटरवर "सायलेंट ऑब्झर्व्हर मशीन' बसविले जाणार आहे. हे यंत्र सोनोग्राफी यंत्रावर बसविले जाईल. त्याद्वारे संबंधित डॉक्टरने स्त्री भ्रूण असल्याची तपासणी केली का? याची नोंद होणार आहे. त्याशिवाय प्रत्येक तपासणीची नोंद होईल. त्या आधारे जिल्हा रुग्णालयाचा पथकाला संबंधित डॉक्टरांवर कारवाई करणे सोयीचे होणार असून, स्त्री भ्रूणहत्या थांबण्यास मदत होईल.

**सामाजिक हिंसाचार**

या प्रकारात समाजाकडून विविध प्रकारांनी महिलांना त्रास दिला जातो. यात छेडाछेड, विनयभंग, बलात्कार असे मुद्दे येतात. एकतर्फी प्रेमातून केला जाणारा असिड हल्ला, चाकू हल्ला. तसेच ऑफीस मध्ये काम करणाऱ्या महिलांना बऱ्याच वेळा छेडाछेडीला तोंड द्यावे लागते. या सगळ्यामागे पुरुषाच्या लेखी बाईचे असलेले दुय्यम स्थान, तिच्यावर त्याने प्रस्थापित केलेला मालकीहक्कच कारणीभूत आहे. समोरची व्यक्ती म्हणजे स्त्री ही आपल्या मालकीची वस्तू असल्याने तिच्यावर अन्याय, अत्याचार करणे सहज शक्य आहे, असे पुरुषाला वाटत राहते. ती प्रतिकार करू शकणार नाही असे गृहीत धरूनच पुरुषांकडून एवढी हिंमत होते. स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना घडल्यावर त्याचे पडसाद वेगवेगळ्या स्तरांवर उमटतात. अगदी रस्त्यांपासून संसदेपर्यंत. पण त्या घटना होऊ नयेत म्हणून जनजागृती मात्र कमीच होते.

**शिक्षणाच्या समस्या**

महिला ह्या शिक्षणाच्या क्षेत्रात आजही मागे आहेत. आजही ग्रामीण भागात शिक्षणासाठी पाठवले जात नाही. मुलींना शिकून काय करायचं हाच विचार आपल्या समाजत रुजला आहे. पण महिलांना शिक्षण दिले तर त्या आपल्या कुटुंबा बरोबरच देशाचा विकास करू शकतात. एक महिला शिकली तर एक कुटुंब शिकते. महिलांसाठी सरकारने विविध शैक्षणिक योजना आणल्या आहेत पण जो पर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तो पर्यंत त्या योजनांचा फायदा महिलांना मिळणार नाही. महिला फक्त चूल आणि मूल यासाठी या मानसिकतेतून आता समाजाने बाहेर पडले पाहिजे.



Scanned with OKEN Scanner

**आरोग्याच्या समस्या**

भारतातल्या दर दोन महिलांमागे एक महिला कसल्या ना कसल्या अशक्तपणाच्या तक्रारीने ग्रस्त आहेत. ३५ टक्के महिला गंभीर स्वरूपाच्या अशक्त आहेत तर १५ टक्के महिलांना कमी गंभीर स्वरूपाच्या अशक्ततेचा त्रास आहे. महिलांसाठी पुरेशा वैद्यकीय सोयी उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या-मध्ये ही समस्या निर्माण झाली असल्याचे मत काही महिला डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. महिलांच्या जीवनात आरोग्य हा शेवटच्या प्राधान्याचा विषय असतो. लहान-मोठ्या आजारासाठी बायकांनी डॉक्टरकडे जाण्याची गरज नसते, असे सरसकट मानले जाते. त्यामुळे त्यांचे हे लहान-मोठे आजार बघता बघता मोठे होतात आणि गंभीर स्वरूप धारण करतात.

विशेषत: कर्करोगाच्या बाबतीत ही गोष्ट लक्षात येते. कितीही त्रास होत असला तरी तो सहन केला पाहिजे, ही महिलांची मानसिकता असल्यामुळे त्या कर्करोगाच्या पहिल्या अवस्थेतील त्रास तसाच अंगावर काढतात आणि जेव्हा त्या तपासण्यासाठी म्हणून डॉक्टरकडे जातात तेव्हा कर्करोग पुढच्या अवस्थेत गेलेला असतो. भारतात महिलांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. त्यामागे त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष हेच कारण आहे. भारतात सध्या कुपोषित बालक आणि अशा कुपोषित बालकांचे अवेळी होणारे मृत्यू ही मोठी गंभीर समस्या मानली जात आहे आणि त्यावर भरपूर चर्चा होत आहे. परंतु महिलांमधील कुपोषण ही काही कमी गंभीर समस्या आहे असे नाही.आज विज्ञानाने एवढी प्रगती केली असली तरी देखील महिलांच्या आरोग्याच्या समस्या तशाच आहेत अशा पध्दतीने या महिलांच्या प्रमुख समस्या आहेत

अशा प्रकारे विनयभंग छेडछाड बलात्कार वेठबिगार व प्रेमभंग अशा अनेक महिलांच्या समस्या आहेत.

**संदर्भ सूची**

१. राम आहुजा.सामाजिक समस्या, २०००, रावत पब्लिकेशन, जयपूर
२. भारतातील सामाजिक समस्या, दुरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. समाजशास्त्र, इ.१२ वी, फडके प्रकाशन, कोल्हापूर



Scanned with OKEN Scanner